# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**No,CGRF/AZ/R/78/2007/47/** **Date**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Sau.Kalawatibai Lahanu Bhalerao, R/o Krishnapurwadi,PostSawangi(Harsool) Tq. Aurangabad ,Dist.Aurangabad.

**Dear Sir**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from** Sau.Kalawatibai Lahanu Bhalerao, R/o Krishnapurwadi, Post Sawangi(Harsool) Tq. Aurangabad ,Dist.Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 15.01.2008 at 12.00 Hrs.**

You are also requested to be present along with the concerned in charge at the time of hearing.

**Encl As above**.

Copy to:-
Sau.Kalawatibai Lahanu Bhalerao,
R/o Krishnapurwadi,
PostSawangi(Harsool)
**Tq. Aurangabad ,Dist.Aurangab**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/आर/७०/२००४७**
**तक्रार दाखल दिनांक ;-२८/१२/२००७**
**निकाल दिनांक ;- २२/०२/२००८**

**श्री सौ. कलावतीबाई लाहनू भालेराव,**
**रा. कृष्णापूरवाडी पोस्ट सावंगी (हर्सूल),**
**ता. जिल्हा :- औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक २८/१२/२००७ रोजी दाखल

केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक २८/१२/२००७ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) किंवा नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १५/०१/२००८ रोजी ठेवण्यात आली.

१) ग्राहकाने दाखल केलल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार गैर अर्जदार वीज कंपनीकडून घरगुती वापराचे २००१ साली वीज पुरवठा घेतला असून त्याचा ग्राहक क्रमांक ४९०८३०३०३०६२ असा आहे. त्यांना ३१/०६/२००४ या कालावधीत चालू व मागिल मीटर रिडींग ४२७७ व ४१९७ असे दाखवून वीज बिल देण्यात आले जे त्यांनी भरले आहे. त्यानंतर त्यांचे मीटर चालू स्थितीत असतांना देखील त्यांना मीटर फॉल्टी असे दर्शवीत ज्यास्तीचे बिल त्यांना देण्यात आले महावितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक निवारण समीती यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांच्या तक्रारीची कोणतीच दखल न घेतल्या गेल्या मुळे त्यांनी या मंचात तक्रार दाखल केली असून त्याला देण्यात आलेली चुकीची बिले रद्द करण्यात यावीत तसेच महाराष्ट्र राज्य नियामक आयोग यांनी देण्यात आलेली सरासरीवर आधारीत सर्व वीज बिले रद्द करण्याचे आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे. त्याच प्रमाणे या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत करु नये असा आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली .

दिनांक १५/०१/२००८ रोजी अर्जदाराचे प्रतिनिधी म्हणून श्री लहानू केरुबा भालेराच उपस्थित होते.नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री एस. एस. किन्नुर हे उपस्थित होत. अर्जदाराच्या तक्रारीवर त्यांनी

आपला जबाब मंचास दाखल केला ज्याची एक प्रत अर्जदारास देण्यात आली. त्यांनी दाखल केलेल्या जबाबानुसार सप्टेंबर २००५, डिसेंबर २००५, मार्च २००६ व जून २००७ या कालावधीसाठी अर्जदारास देण्यात आलेली चूकीच्या वीज बिलापोटी त्यांनी एकूण रुपये २१५९६.३८ कमी करुन दिलेले आहे. त्याचप्रमाणे या चुकीच्या बिलापोटी भरलेले व्याज व विलंब आकार कमी करण्यात आले असून ग्राहकास रुपये ३०८१ चे सुधारीत बिल देण्यात आले. अर्जदाराचे मीटर ही बदलण्यात आले असून सदरील मीटर बदलीच्या अहवालाची संगणकात नोंद घेतल्या नंतर अर्जदारास देण्यात आलेली सरासरीवर आधारीत बिले रद्द करुन सुधारीत बिले देण्यात येईल असे त्यांनी जबाबात पुढे म्हटले आहे. अर्जदाराचे तक्रारीचे निवारण करण्यात आले असल्यामुळे त्यांची तक्रार खारीज करण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

दिनांक १५/०१/२००८ रोजी मंचासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी नोडल अधिकारी यांनी मीटर बदलीचा अहवाल स्थळ पाहणीचा अहवाल तसेच वीज बिल दुरुस्त केल्याचा तपशील अहवाल मंचात दाखल केला नसल्यामुळे त्यांना तो पुढील सुनावणीच्या अगोदर दाखल करण्याचे सांगण्यात आले या प्रकरणाचा निकाल पारीत होईपर्यंत अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत न करण्याचे आदेश मंचातर्फे गैर अर्जदार यांना देण्यात आले या प्रकरणाची पुढील सूनावणी दिनांक २२/०१/२००८ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०१/२००८ रोजी ग्राहक प्रतिनिधी तसेच नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीनी बिल दुरुस्त अहवालाची प्रत, मीटर बदलीचा रिपोर्ट व स्थळ पाहणी अहवाल सादर केला अर्जदाराने महाराष्ट्र वीज नियामक

अयोग यांचा केस नंबर २/२००३ यांच्या निवाड्याची प्रत मंचात दाखल केली व त्यातील आदेशाप्रमाणे ३ (तीन) महिने वगळता सरासरीवरील आधारीत देण्यात आलेली सर्व वीज बिले रद्द करण्याची विनंती मंचास केली

दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरुन व सी.पी.एल.चे निरिक्षण केल्यावर मंचास असे आढळून येते की, अर्जदाराच्या येथे नविन वीज पुरवठा करतांना बसविण्यात आलेल्या मीटरचा क्रमांक १०४९४०८० असा असून जून २००१ ते जून २००४ या कालावधीत त्याला मीटरवर खालील प्रमाणे नोंदी दर्शवित वीज बिल देण्यात आले.

| अ.क्र. | कालावधी | चालू रिडींग | मागील रिडीग | वीज वापर | बिलावरील शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | सप्टेंबर २००४ | ४२७७ | ४२७७ | ६३ | फॉल्टी |
| २. | डिसेंबर २००४ | २४७० | ४२७७ | ६३ | फॉल्टी |
| ३. | मार्च २००५ | २४७० | २४७० | ६३ | आर.एन.टी. |
| ४. | जून २००५ | ४२७० | २४७० | १८०० | |
| ५. | सप्टेंबर २००५ | ४२७० | २४७० | १८०० | |
| ६. | डिसेंबर २००५ | ४२७० | २४७० | १८०० | |
| ७. | मार्च २००६ | ४२७० | ४२७० | १८०० | फॉल्टी |
| ८. | जून २००६ | ४२७० | ४२७० | १८०० | फॉल्टी |
| ९. | ऑगष्ट २००६ | ४२१० | ४२७० | १२०० | फॉल्टी |
| १०. | सप्टेबर २००६ | ४२७० | ४२१० | ६० | |
| ११. | ऑक्टोबर२००६ | ४२७० | ४२७० | ५१० | मीटर चेंज |
| १२. | नोव्हेबर २००६ | ४२७० | ४२७० | ५१० | मीटर चेंज |
| १३. | डिसेंबर २००६ | ४२७० | ४२७० | ३० | मीटर चेंज |

अर्जदाराचे मीटर हे १४/१०/२००६ रोजी बदलण्यात आले त्यावेळी मीटर वरील नोंद ही ०४२७० अशी असल्याचे अढळून येते. अर्जदारास देण्यात आलेल्या वरील बिलाचे निरीक्षण केल्यावर त्याला सप्टेंबर २००४ पासून सतत चूकीची व ज्यास्त रक्कमेचे वीज बिल देण्यात येत होते हे स्पष्ट होते अर्जदाराने मंचात तक्रार दाखल केल्यानंतर त्याच्या मीटर चे दिनांक ०७/०१/२००८ रोजी करण्यात आलेल्या निरीक्षण अहवालावरुन नवीन मीटरचा क्रमांक हा २४४०३५ असा असून त्यावरील रिडींग ही ०४७१ अशी आहे यावरुन दिनांक १४/१०/२००६ रोजी लावण्यात आलेले हे नविन मीटर हे व्यवस्थीतपणे चालू असल्याचे आढळून आले त्यावरुन अर्जदाराचा बिलाचा वाद हा सप्टेंबर २००४ ते १४/१०/२००६ या काळापूरता मर्यादित आहे. वीज वितरण कपंनीने सदरील काळातील वीज बिल दुरुस्त करतांना मीटर नादुरुस्त असल्यामूळे अर्जदाराचा वीज वापर हा सरासरी ३० युनिट प्रतिमहा असा ग्रहीत धरुन वीज बिल दुरुस्ती करण्यास तयार असल्याचे म्हटले आहे. अर्जदाराचे मीटर ऑक्टोबर २००६ मध्ये बदलण्यापुर्वी त्याचा मागील काळातील वीज वापर लक्षात घेता, वीज वितरण कंपनीने ३० युनीट प्रतिमहा सरासरीवर आधारीत बिल देण्याचा प्रकार योग्य नसुन मंच त्यास मान्यता देत आहे. व खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदारास सप्टेबर २००४ ते नोव्हेंबर २००६ या काळातील वीज बिल ३० युनीट प्रतिमहा सरासरीवर आधारीत ३० दिवसाच्या आत सूधारीत करुन देण्यात यावीत.

२) वरीलप्रमाणे सुधारीत बिल देतांना, कोणतेही व्याज व दंड बिलात आकारणी करु नये.
३) अर्जदाराने बिलापोटी भरलेल्या रक्कमेची वजावट या सुधारीत बिलात करण्यात यावी.
४) अर्जदारास झालेल्या गैरसोयीबद्दल व मानसीक त्रासापोटी वीज वितरण कंपनीने अर्जदारास रुपये २५०/- नुकसान भरपाई ३० दिवसाच्या आत द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

जुने पावर हाऊस, पोलीस आयुक्तालयासमोर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, औरंगाबाद.- ४३१ ००१


**Case No. CGRF/AZ/AUR/R /78/ 2007/ 47/**

**Date;-**

**To,**

1. **The Executive Engineer (Adm.)**
   **O/O Superintending Engineer**
   **O & M , Urban Circle, M.S.E.D.C.L.**
   **Aurangabad.**

2. **Smt. Kalawatibai Lahanu Bhalerao,**
   **Resident of Krishnapurwadi, Post Sawangi(Harsool)**
   **Tq. & Dist.Aurangabad.**
   **(Consumer No. (490830303062)**

Sub :- Grievance in case No.CGRF/AZ/AUR/R/78/2007/47 regarding electricity duty.

Please find enclsosed herewith a copy of order passed by the Forum in the case mentioned above.

The consumer, if not satisfied with the decision of the Forum , is at liberty to make a representation to the Electricity Ombudsman, the contact details of whom is as under, within a period of 60 days from the date of this order.

Yours Faithfully,

Encl: A/A

Contact Details of Electricity Ombudsman:
**The Electricity Ombudsman**
**Maharashtra Electricity Regulatory Commission**
**606-608, Keshava Building**
**Bandra-Kurla Complex, Mumbai 400 051**
**Tel.No. 022-26590339**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ.

जुने पावर हाऊस, पोलीस आयुक्तालयासमोर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, औरंगाबाद.- ४३१ ००१

**No. CGRF/AUR/AZ/R/78/2007/47/ Date:-**

To,
The Executive Engineer (Adm.)
O/O Superintending Engineer
O & M , Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Non compliance of CGRF order.

Ref: Consumer's application dt.27.03.2008
( Case No. CGRF/AZ/AUR/R /78/ 2007/ 47 )

Enclosing herewith the copy of the letter received from the consumer Smt.Kalawatibai Lahanu Bhalerao, R/o Krishnapurwadi, Post Sawangi (Harsool) Tq.& Dist. Aurangabad Consumer No.490830303062, for non compliance of CGRF order .

You are requested to report the compliance immediately.

Encl: A/A

Copy S.W. R. to:-

1. Chief Engineer ( AZ)
   MSEDCL Aurangabad.

Copy to:-

2. Smt. Kalawatibai Lahanu Bhalerao,
   R/o Krishnapurwadi, Post Sawangi (Harsool)
   Tq.& Dist. Aurangabad